# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३१९५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**क्र. १४४२(२)(२)/२०१८/१३-अ** **दि. १७ मार्च, २०२०**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब (मुख्य) परीक्षा- २०१८**

(पोलीस उपनिरीक्षक)

**अंतिम निकालाची घोषणा**

**जाहिरात क्र. १४/२०१८ व जाहिरात क्र. ३३/२०१८**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगतर्फे पोलिस उपनिरीक्षक गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील एकूण **३८७** पदांसाठी दि. २६ ऑगस्ट,२०१८ (पेपर क्र.१) व दि. ०२ सप्टेंबर,२०१८ (पेपर क्र.२) रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रीत, गट - ब (मुख्य) परीक्षा- २०१८ (पोलीस उपनिरीक्षक) चा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन **दिनांक १७ मार्च, २०२०** रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

सदर परीक्षेमध्ये **सोलापूर** या जिल्हयातील **श्री.नवले वैभव अशोक,** बैठक क्रमांक **PN००६०६८,** हे राज्यातून **प्रथम** आले आहेत व **अहमदनगर** या जिल्हयातील **श्री.काळे ज्ञानदेव रघुनाथ,** बैठक क्रमांक **PN००९२१७,** हे मागासवर्गवारीतून **प्रथम** आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **सातारा** या जिल्हयातील **श्रीमती कोळेकर दिपाली सुर्यकांत,** बैठक क्रमांक **PN००१०२९,** हया राज्यात **प्रथम** आल्या आहेत.

**२.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**३.** प्रस्तुत मुख्य परीक्षा दि. २६ ऑगस्ट, २०१८ (पेपर क्र.१) व दि. ०२ सप्टेंबर, २०१८ (पेपर क्र.२) रोजी मुंबई, औरंगाबाद, पुणे व नागपूर या जिल्हयात घेण्यात आली. लेखी परिक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी **१६५९** उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दि. ०६ नोव्हेंबर,२०१९ ते २९ जानेवारी, २०२० या कालावधीत झाल्या आहेत.

**४.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडू आरक्षणासाठी दावा केलेल्या उमेदवारांसंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक, क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित** अराजपत्रित **गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दि. २० मार्च, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील. तसेच पूर्व परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यांसदर्भातील उक्त दिनांकाची किंवा तत्पूर्वीची पोचपावती शासनास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राचा संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल शासनास सादर करणे अनिवार्य राहील.**

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना **क्रमांक ३.८** पहावे)

दिनांक : १७ मार्च, २०२० उपसचिव

ठिकाण : मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग